**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे**
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१**
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com

जा.क्र./प्रशि-४/टे-२०५/व्य.कोटा/२०१८-१९/ ४३८३ दिनांक: 12 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित/विनाअनुदानित अध्यापक विद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय : डी.एल.एड.प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१८-१९ बाबत...**

संदर्भ :१.मा.संचालक,म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.२५८५,दि ४.६.२०१८
२.या कार्यालयाचे पत्र क्र.४२०१, दि ५.६.२०१८
३.मा.संचालक,म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.२६६४, ८.६.२०१८

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यांत येते की, मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील संदर्भिय पत्र क्र.दि ८.६.२०१८ अन्वये अध्यापक विद्यालयांचे व्यवस्थापन कोटा प्रवेशाबाबतचे सुधारीत वेळापत्रक प्रसिध्द केले आहे.

सदर पत्रान्वये अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटा प्रवेशाचे वेळापत्रकाचे काटेकारपणे पालन करावयाचे असून सदरची व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रक्रिया दिनांक ४ जून, २०१८ ते २० जुन,२०१८ या कालावधीत पूर्ण करावयाची आहे. तसेच दिनांक ३० जुन, २०१८ पर्यंत सदरचे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्रस्तूत कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. दिनांक ३० जुन, २०१८ नंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत : परिषदेकडील दिनांक ८.६.२०१८ चे पत्र जोडले असून सदर पत्रात दिलेल्या सूचनेनुसार आपण व्यवस्थापन कोटा प्रवेशाबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**(भारत बीरनारे)**
**कनिष्ठ प्रशासन अधिकारी**
**शिक्षण उपसंचालक कार्यालय,**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत : माहितीस्तव-**
१.मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
२.प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था,पुणे/अहमदनगर/सोलापूर
२/-परिषदेकडील दि ८.६.२०१८ च्या पत्रातील सूचनेनुसार आपल्या जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयांना

Scanned by CamScanner

Government of Maharashtra
Maharashtra Academic Authority
Sadashiv Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938,24475571
Website : www.maa.ac.in
E-Mail : preserviceedudept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र विद्या प्राधिकरण
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दू.क्र. (०२०) २४४७६९३८, २४४७५५७१
वेबसाईट : www.maa.ac.in
ईमेल: preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र. विप्रा/सेवापूर्व शिक्षण/२०१८/ 2664

दिनांक : ८.६.२०१८

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे -. ... 
12 JUN 2018
८४७८

विषय :- डी.एल.एड. प्रवेश सन २०१८-१९ मधील व्यवस्थापन कोटयाबाबत....

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. २५८६ दि. ४.६.२०१८
२. दि. ८.६.२०१८ रोजी घेण्यात आलेली राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व संनियंत्रण सभा.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये या कार्यालयाने डी.एल.एड. प्रवेश सन २०१८-१९ मधील व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाबाबतचे कार्यवाहीच वेळापत्रक कळविण्यात आले होते.

तथापि संदर्भ क्र. २ अन्वये राज्यस्तरीय प्रवेश निवड, निर्णय व संनियंत्रण समिती सदस्यांनी व्यवस्थापन कोटयातील प्रवेशाबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे मान्य केले आहे.

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | संबंधित अध्यापक विद्यालयानी व्यवस्थापन कोटयाची प्रवेश प्रक्रिया प्रचलित नियमानुसार करावी | **दि.४.६.२०१८ ते २०.६.२०१८** |
| २ | अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटा प्रवेशाचे प्रस्ताव संबंधित **विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे** सादर करणे. | **दि. ३०.६.२०१८** |
| ३ | विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेऊन संबंधितांना कळविणे. | **दि. २१.६.२०१८ ते ५.७.२०१८** |
| ४ | **मंजूर व्यवस्थापन कोटयाची माहिती अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन भरणे.** | **दि.१०.७.२०१८ पर्यंत** |
| ५ | **विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी** त्यांचे Login मधून व्यवस्थापन कोटा मंजूर प्रवेशाची ऑनलाइन माहिती Confirm करणे | **दि. १५.७.२०१८ पर्यंत** |
| ६ | **प्रथम वर्ष सुरु दिनांक** | **दिनांक १६ जुलै २०१८** |

दिनांक १६ जुलै २०१८ नंतर डी.एल.एड. प्रवेशाची लिंक चालू राहणार नाही.

तरी संबंधितांनी वेळापत्रकानुसार प्रवेशाबाबत कार्यवाही करावी. विहित कालावधीत कार्यवाही न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास यांची संपूर्ण जबाबदारी संबंधित, प्राचार्य अध्यापक विद्यालयांची राहील याची नोंद घ्यावी व संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०

८१

Scanned by CamScanner